*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*पिंपरी - १८ नगरसचिव कार्यालय*
*क्रमांक :- नस/४/कावि/३२०/२०१२*
*दिनांक :- ०२ / ०३ / २०१२*

*प्रति,*
*मा. --------------------------------*
*सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,*
*पिंपरी-४११ ०१८.*

*विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*सार्वत्रिक निवडणुकांनंतरची पहिली महापालिका सभा (विशेष बैठक) दि. १३.३.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेबाबत.*

*माननीय महोदय/महोदया,*

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्र. १ (ब) (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे नियम २००५ मधील नियम क्र. ३(२) अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पहिली महापालिका सभा (विशेष बैठक) मंगळवार दिनांक १३.३.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात भरणार आहे. सोबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पहिल्या महापालिका सभेची ( विशेष बैठकीची ) कार्यपत्रिका जोडली आहे. सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.*

*आपला विश्वासू*

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

*प्रत- १) कार्यालयीन नोटीस बोर्ड.*
*२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी*

*\\१७२.१६.०.६७\e drive\Nagersachiv१\New Folder\Ele २०१२.doc*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कामाकरिता*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८*

## *सूचना*

*[ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्रमांक १ (बी)(एच)(आय) (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुक घेणे नियम २००५ मधील नियम क्र.३ (२)) अन्वये. ]*

### *कार्यपत्रिका क्रमांक - १*

*मार्च-२०१२*

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्र.१ (ब) (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे नियम २००५ मधील नियम क्र.३ (२)] अन्वये सार्वत्रीक निवडणुकी नंतरची----*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पहिली सभा (विशेष बैठक) मंगळवार दिनांक १३ मार्च-२०१२ या दिवशी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात भरेल.*

*सदर सभेत खालील कामकाज होईल.*

### *निवडणुका*

*विषय क्रमांक :- १) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ प्रमाणे करणे.*

*टिप - १) महाराष्ट्र महानगरपालिका ( महापौर पदांचे आरक्षण) नियम १९९४ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पद " महिला" या प्रवर्गासाठी राखीव असे ठेवलेले आहे.)*

*२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.५ अन्वये मा. महापौर व मा. उपमहापौर यांची निवड करण्यासाठी बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा. विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल)*

*------*

### *नियुक्त्या*

*विषय क्रमांक :- २) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (२) मधे तरतुद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर १६ ( सोळा ) मा. सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करणे..*

*विषय क्रमांक :-३)  मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे खालील ४ (चार) विशेष समित्या नेमणे :-*

*(१) विधी समिती*

*(टिप-विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)*

*(२) महिला व बालकल्याण समिती-*

*अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.*

*ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.*

*(३) शहर सुधारणा समिती*

*( टिप- शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत )*

*(४) क्रिडा समिती*

*( टिप- क्रिडा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत )*

*(टिप-उपरोक्त क्र. १ ते ४ प्रमाणेच्या विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत)*

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*नगरसचिव कार्यालय*
*पिंपरी,पुणे-४११०१८*
*क्र.नस/४/कावि/ ३२० /२०१२*
*दिनांक :- ०२ / ०३ / २०१२*

---

*(टिप :- प्रस्तूत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)*